दै. पुण्य नगरी दि. 17.02.2020

# आठ तासांत चोरासह वाहन मांडवी पोलिसांच्या ताब्यात

**मांडवी/प्रतिनिधी**

मांडवी शहरात पार्किंग केलेली बोलेरो मॅक्स रात्री चोरीला गेली. पोलिसांनी केलेल्या तपासात अवघ्या आठ तासात विदर्भातील नस्करी पार्डी येथे दोन चोरासह ही बोलेरो गाडी ताब्यात घेण्यात आली. या चोरांनी त्याच रात्री स्वीफ्ट डिजायर कार चोरून नेण्याचाही प्रयत्न केला पण तो फसला. वाहन चोरीच्या या घटनेमुळे गावात खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की शनिवारी (दि. १५) रात्री रोहन मादावार यांच्या मालकीची बोलेरो मॅक्स (एमएच २६ ए डी ३४२९) मांडवी येथील बालाजी कृषी सेवा केंद्रासमोरून चोरट्यांनी पळवली. तर शरद कोटावार यांची स्वीफ्ट डिजायर कार (एमएच २६ एके ६६६७) च्या काचा फोडून पळविण्याचा प्रयत्न केला पण तो फसला. सकाळी वाहन चोरीस गेल्याचे पाहून रोहन मादावार यांनी मांडवी पोलिसात तक्रार दिली. सपोनि संतोष केंद्रे यांनी आजूबाजूच्या पोलीस ठाण्यांना याची माहिती दिली.



त्यानंतर रविवारी सकाळी त्यांना नस्करी पाडी येथे या क्रमाकांच्या वाहनाने जनावरांच्या गोठ्यास धडक दिल्याची माहिती एकाने फोन करून दिली. यावरुन सपोनि केंद्रे यांनी विजय कोळी, राजू डांगे या पोलिसांसह तक्रारदार मादावार, पोलीस मित्र सुनिल नत्थू चव्हाण यांना घटनास्थली पाडीला पाठविले. हे पथक तेथे गेले असता वाहन चोर पवन हरिभाऊ निकोडे (वय २२) व शेतात पळून जाणाऱ्या गजानन पुंडलिक सोनूले (वय २७, दोघे रा. पाटोदा (बु.) यांना ताब्यात घेतले. ही सर्व कारवाई आठ तासांत करण्यात आली. सहायक पोलिस निरीक्षक विजय कोळी अधिक तपास करीत आहेत.

पुण्य नगरी 17.02.2020